# वाघ अभियांत्रिकीच्या ५७५ विद्यार्थ्यांना नोकरी

## नव्वदहून अधिक उद्योगसमूहांमध्ये प्लेसमेंट; सर्वाधिक २० लाखांचे पॅकेज

▶ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २ : के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँन्ड प्लेसमेंट सेल मार्फत दरवर्षी प्रमाणे अखेरच्या वर्षातील विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच नोकरी मिळावी यासाठी कॅम्पस ड्राईव्ह घेण्यात आले. विविध मल्टिनॅशनल उद्योग समूहातर्फे कॅम्पस ड्राईव्ह पार पडले. यात ५७५ हून अधिक विद्यार्थ्यांना नोकरीची सुवर्णसंधी मिळाली आहे. त्यातील ३६० मुले व २१५ मुलींचा समावेश आहे. यात विद्यार्थ्यांना सरासरी ४.५० लाख रुपयांचे पॅकेज तर सर्वाधिक २० लाख रुपयांपर्यंतचे पॅकेज प्राप्त झालेले आहेत.



नाशिक : विविध आस्थापनांमध्ये संधी मिळालेले के. के. वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसह मान्यवर.

मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल विभागातील अनुक्रमे १०० व ८० अशा एकूण १८० विद्यार्थ्यांना मिळालेल्या नोकरी ही या यंदाच्या प्लेसमेंट वैशिष्ट्ये आहे. या सर्व कंपनीच्या मुलाखतीमध्ये प्रथमतः ऑनलाइन टेस्ट त्यानंतर टेक्निकल टेस्ट, वैयक्तिक मुलाखतीची फेरी घेण्यात आली. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण विकसित होऊन एक समाजाभिमुख अभियंता निर्माण व्हावा यासाठी महाविद्यालय तत्परतेने कार्य करत आहे व भविष्यातही असेच कार्य करेल, असा विश्वास प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी व्यक्त केला आहे.

या शैक्षणिक वर्षात एकूण ९० हून अधिक नामांकित उद्योगसमूहांची महाविद्यालयात कॅम्पससाठी भेटी देऊन विद्यार्थ्यांच्या मुलाखती पार पडल्या. यात आयटी इंडस्ट्रीज, कोअर इंडस्ट्रीज, सर्व्हिस इंडस्ट्रीज यांचा समावेश होतो. यामध्ये प्रामुख्याने टीसीएस, फिनिक्यू, क्रॉम्प्टन ग्रिव्हस, महिंद्रा अँन्ड महिंद्रा, केपीआयटी, केएसबी, बॉश, टीआयएए, जेएनके, अँटॅस, अदानी, एबीबी, टोयो यासह आदी उद्योग समूहांचा समावेश असल्याची माहिती ट्रेनिंग अँन्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली.

संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त अशोक मर्चंट, विश्वस्त चांगदेवराव होळकर, विश्वस्त व प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, विश्वस्त व विभागप्रमुख डॉ. एस. एस. साने, विश्वस्त शकुंतला वाघ, विश्वस्त डॉ. प्रीती भामरे, विश्वस्त व विभाग प्रमुख डॉ. व्ही. एस. माने, विभाग प्रमुख डॉ. डी. एम. चांदवडकर, डॉ. बी. ई. कुशारे, डॉ. एस. वाय. कुटे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

Nashik, Nashik-Today
03/07/2023 Page No. 3

# देशदूत

www.deshdoot.com

# वाघ अभियांत्रिकीच्या ५७५ विद्यार्थ्यांना नोकरी

▸▸ पंचवटी । दि. ६ प्रतिनिधी

वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट सेलमार्फत दरवर्षीप्रमाणे अखेरच्या वर्षातील विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच नोकरी मिळावी, या उद्देशाने कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन केले जाते. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये विविध मल्टिनॅशनल उद्योग समूहांतर्फे कॅम्पस ड्राईव्ह पार पडले. यामध्ये ५७५हून अधिक विद्यार्थ्यांना नोकरीची सुवर्णसंधी मिळाली, त्यात ३६० मुले व २१५ मुलींचा समावेश आहे. यात विद्यार्थ्यांना सरासरी ४.५० लाख रुपयांचे पॅकेज तर सर्वाधिक २० लाख रुपयांपर्यंतचे पॅकेज प्राप्त झाले आहे.



कॉम्प्युटर व आयटी या विभागातील १७०हून अधिक विद्यार्थ्यांना प्लेसमेंटची संधी मिळाली असून, विशेष म्हणजे मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल विभागातील अनुक्रमे १०० व ८० अशा एकूण १८० विद्यार्थ्यांना मिळालेली नोकरी हे यंदाच्या प्लेसमेंटचे वैशिष्ट्य होय. या सर्व कंपनीच्या मुलाखतीमध्ये प्रथमतः ऑनलाईन टेस्ट, त्यानंतर टेक्निकल टेस्ट, वैयक्तिक मुलाखतीची फेरी घेण्यात आली. हे सर्व निकष पार केल्यानंतर विद्यार्थ्यांची निवड केली जाते. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण विकसित होऊन एक समाजाभिमुख अभियंता निर्माण व्हावा, यासाठी महाविद्यालय तत्परतेने कार्य करत आहे व भविष्यातही असेच कार्य करत राहील, असा विश्वास प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी व्यक्त केला.

के. के. वाघ संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, डॉ. एस. एस. साने, शकुंतला वाघ, डॉ. प्रीती भामरे, डॉ. व्ही. एस. माने, डॉ. डी. एम. चांदवडकर, डॉ. कुशारे, डॉ. एस. वाय. कुटे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

Deshdoot Edition
Jul 7, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

देशदूत

# के. के. वाघमध्ये विभागीय सुसंवाद मेळावा

**पंचवटी** | के. के. वाघ कृषी महाविद्यालय, नाशिक येथे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्याद्वारे कृषी व कृषी संलग्न शिक्षण, तंत्रशिक्षण, वैद्यकीय व उच्च शिक्षण पदवी प्रवेश प्रक्रिया २०२३-२४ विभागीय सुसंवाद मेळावा उत्साहात पार पडला. याप्रसंगी प्रवेश नियामक प्राधिकरणचे अध्यक्ष जे. पी. डांगे, तंत्र शिक्षणचे समन्वयक राजेंद्र लोंढे, कृषी शिक्षणचे समन्वयक डॉ. मंगेश निकम, वैद्यकीय शिक्षणचे समन्वयक डॉ. सिद्धेश नार, फाईन आर्टचे समन्वयक डॉ. विजय सपकाळ, संस्थेचे विश्वस्त व प्राचार्य डॉ. के. एस. नांदुरकर, समन्वयक डॉ. व्ही. एम. सेवलीकर व कृषी व संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ.एस. एम. हाडोळे, प्रा. एन. जी. देवरे, प्रा. व्ही. एस. संधान, डॉ.एन एस. पाचपोर व डॉ. एच. व्ही. देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशाचा अर्ज सादर करणे, प्रवेश प्रक्रियेतील विविध टप्पे, अर्ज भरताना घ्यावयाची काळजी, ऑप्शन फॉर्म भरण्याची पद्धत आवश्यक कागदपत्रे आदींबाबत राजेंद्र लोंढे यांनी विद्यार्थी-पालकांना मार्गदर्शन केले. त्यानंतर



महाविद्यालये तसेच सीईटी कक्षामार्फत वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येणारे वेळापत्रक माहिती पुस्तिका व सूचनांचे काटेकोरपणे वाचन व पालन करावे, असे आवाहन केले. जे. पी. डांगे यांनी पालक व विद्यार्थ्यांना माहिती पुस्तिकेचे सखोल वाचन करण्याचा सल्ला दिला. महाविद्यालयांनी प्रवेश प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर प्रवेश [illegible] सादर करावा. याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थी व पालक यांचे शंकांचे निरसन केले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, डॉ. के. एन.नांदुरकर, डॉ. एस. एस. साने, शकुंतला वाघ, डॉ. व्ही. एस. माने, एस. जी. ठाकरे, डॉ. प्रीती भामरे, अजिंक्य वाघ, प्रा. के. एस. बंदी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले

Deshdoot Edition
Jul 9, 2023 Page No. 8
Powered by : eReleGo.com

# अभियांत्रिकीच्या ६ विद्यार्थ्यांना प्रत्येकी २ लाखांची शिष्यवृत्ती

प्रतिनिधी | नाशिक

रिलायन्स फाउंडेशनतर्फे दिल्या जाणाऱ्या रिलायन्स फाउंडेशन अंडर ग्रॅज्युएट स्कॉलरशिपसाठी के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रथम वर्षातील ६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

यामध्ये ए.आय.डी. एस. विभागातील वेदांत अग्रवाल व दिशा वाघ, सी. एस. डी. विभागातील अनिकेत मोरे, मेकॅनिकल विभागातील सर्वेश जाधव, रोबोटिक्स आणि ऑटोमेशन विभागातील रजनीश गुमटे व चेतन सावंत या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना पदवीच्या कालावधीदरम्यान प्रत्येकी दोन लाखांची आर्थिक मदत होणार आहे.

रिलायन्स फाउंडेशनतर्फे दरवर्षी 'अंडर ग्रॅज्युएट स्कॉलरशिप' साठी देशभरातील कोणत्याही संस्थेत, कोणत्याही शाखेत प्रवेश घेतलेल्या पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची संधी दिली जाते. पात्र झालेल्या विद्यार्थ्यांना 'रिलायन्स फाउंडेशन' पदवीच्या कालावधीत प्रत्येकी दोन लाख रुपये प्रदान करत असते. या विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, प्रथम वर्ष विभागप्रमुख डॉ. अनुराधा पवार, प्रथम वर्ष समन्वयक डॉ. विलास पाटील, संगणक विभाग प्रमुख डॉ. शिरीष साने यांचे मार्गदर्शन लाभले.

देशदूत

# वाघ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती



**नाशिक ।** रिलायन्स फाउंडेशनकडून दिली जाणाऱ्या रिलायन्स फाउंडेशन अंडरग्रॅज्युएट स्कॉलरशिपसाठी के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रथम वर्षातील ६ विद्यार्थ्यांची निवड झाली. यात ए.आय.डी.एस. विभागातील वेदांत अग्रवाल व दिशा वाघ, सी.एस.डी. विभागातील अनिकेत मोरे, मेकॅनिकल विभागातील सर्वेश जाधव, रोबोटिक्स आणि ऑटोमेशन विभागातील रजनीश गुमटे व चेतन सावंत या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना पदवीच्या कालावधी दरम्यान प्रत्येकी दोन लाखाची आर्थिक मदत होणार आहे. अध्यक्ष समीर वाघ, प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर डॉ. अनुराधा पवार, डॉ. विलास पाटील, डॉ. शिरीष साने, सचिव प्रा. के. एस. बंदी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

[redacted]

Deshdoot Edition
Jul 10, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com



**नाशिक : सीईटी सेलच्या विभागीय सुसंवाद मेळाव्याप्रसंगी उपस्थित मान्यवर.**

# सीईटी विभागीय सुसंवाद मेळावा उत्साहात

**नाशिक :** के. के. वाघ कृषी महाविद्यालयात राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष (मुंबई) यांच्याद्वारे कृषी व कृषी संलग्न शिक्षण, तंत्रशिक्षण, वैद्यकीय व उच्चशिक्षण पदवी प्रवेशप्रक्रिया २०२३-२४ विभागीय सुसंवाद मेळावा उत्साहात पार पडला. मेळाव्यात प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशाचा अर्ज सादर करणे, प्रवेशप्रक्रियेतील विविध टप्पे, अर्ज भरताना घ्यावयाची काळजी, ऑप्शन फॉर्म भरण्याची पद्धत आवश्यक कागदपत्रे आदींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. व्यासपीठावर प्रवेश नियामक प्राधिकरणचे अध्यक्ष जे. पी. डांगे, तंत्रशिक्षणचे समन्वयक राजेंद्र लोंढे, कृषी शिक्षणचे समन्वयक डॉ. मंगेश निकम, वैद्यकीय शिक्षणचे समन्वयक डॉ. सिद्धेश नार, फाइन आर्टचे समन्वयक डॉ. विजय सपकाळ, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, समन्वयक डॉ. व्ही. एम. सेवलीकर, डॉ. एस. एम. हाडोळे, प्रा. एन. जी. देवशेटे, प्रा. व्ही. एस. संधान, डॉ. एन. एस. पाचपोर, डॉ. एच. व्ही. देशमुख आदी उपस्थित होते. पालक व विद्यार्थ्यांना माहिती पुस्तिकेचे सखोल वाचन करण्याचा सल्ला डांगे यांनी दिला. महाविद्यालयांनी प्रवेशप्रक्रिया पूर्ण केल्यानंतर प्रवेश मान्यता प्रस्ताव कशा पद्धतीने सादर करावा. याबाबतच्या सविस्तर मार्गदर्शनानंतर विद्यार्थी व पालकांचे शंकांचे निरसन केले. मेळाव्याला संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त अशोक मर्चंट, चांगदेव होळकर, डॉ. के. एन. नांदूरकर, डॉ. एस. एस. साने, शकुंतला वाघ, डॉ. व्ही. एस. माने, एस. जी. ठाकरे, डॉ. प्रीती भामरे, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी आदींचे मार्गदर्शन लाभले.



# एबीबी इंडिया-के. के. वाघ इन्स्टिट्यूटमध्ये सामंजस्य करार

## उद्योगांसाठी कुशल मनुष्यबळ निर्मितीवर भर

**नाशिक : प्रतिनिधी**

एबीबी इंडियाने के. के. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनिअरिंग एज्युकेशन अँण्ड रिसर्चसोबत सामंजस्य करार केला असून, या करारावर नुकत्याच स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.या करारांतर्गत नाशिक येथील त्यांच्या कॅम्पसमधील निवडक इंजिनिअरिंग विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष औद्योगिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. १० आठवडे चालणाऱ्या या उपक्रमाचा कॅम्पस अध्ययन व कॉर्पोरेट अंमलबजावणीदरम्यान कौशल्यामधील तफावत दूर करण्याचा आणि उद्योगासाठी सुसज्ज पदवीधर तयार करत मूलभूत क्षेत्रांमध्ये कुशल इंजिनिअर्सचा समूह वाढवण्याचा मनसुबा आहे. सुरुवातीला कॉलेजने निवडलेल्या १३ विद्यार्थ्यांना एबीबी च्या नाशिक कॅम्पसमध्ये टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण देण्यात येईल. विद्यार्थ्यांना वरिष्ठ प्रमुखांचे देखील मार्गदर्शन मिळेल, जे प्रत्यक्ष त्यांच्या प्रगतीचे देखरेख देखील करतील. एबीबी इंडियाचा के. के. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एज्युकेशन अँण्ड रिसर्चसोबत दीर्घकाळापासून सहयोग आहे आणि २०१७ पासून इन्स्टिट्यूटमधील विद्यार्थ्यांना नियमितपणे नियुक्त करत आहे. या सामंजस्य कराराबाबत एबीबी इंडियाच्या डिस्ट्रिब्युशन सोल्यूशन्स डिव्हिजनचे अध्यक्ष गणेश कोठवडे म्हणाले, आमचा भविष्यासाठी सुसज्ज आणि कार्यस्थळाच्या कामकाज पद्धतींबाबत माहीत असलेले टॅलेंट विकसित करण्यासाठी शैक्षणिक संस्थेसोबत सहयोग करण्यावर दृढ विश्वास आहे. कॅम्पसमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षणासह विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा उद्योगाला देखील कुशल टॅलेंटच्या व्यापकतेमधून फायदा होईल.

आम्ही विद्यार्थ्यांना एबीबी नाशिक कॅंपसमधून औद्योगिक स्थितीच्या व्यावहारिक पैलूंची माहिती मिळण्याची संधी देण्यासाठी एबीबी इंडिया चे आभार मानतो. एबीबी उद्योग अग्रणी असल्याने आमच्या विद्यार्थ्यांना क्षेत्रातील सर्वोत्तम बाबींचे प्रशिक्षण घेण्याची आणि कोर्सेस पूर्ण झाल्यानंतर उद्योगामध्ये सामील होण्याची संधी मिळेल, असे के. के. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनिअरिंग एज्युकेशन अँण्ड रिसर्चचे प्राचार्य डॉ. केशव नंदूरकर म्हणाले. एबीबीचा प्रतिभावान विद्यार्थ्यांना त्यांनी संपादित केलेली कौशल्ये, क्षमता व प्लेसमेंट प्रक्रियेदरम्यान कामगिरीच्या आधारावर शैक्षणिक वर्षाच्या शेवटी रोजगार संधी देण्याचा मनसुबा आहे.

एबीबी इंडिया आपल्या समुदाय आऊटरिच उपक्रमांचा भाग म्हणून शिक्षण आणि अप-स्किलिंगवर लक्ष केंद्रित करत आहे. कंपनी महिला इंजीनिअर्सना स्टेम करिअर्सचा अवलंब करण्यामध्ये साह्य करण्यासाठी लीला पूनावाला फाऊंडेशन (एलपीएफ) सोबत सहयोगाने सर्वांगीण उपक्रम देखील राबवते. हा सर्वांगीण उपक्रम आर्थिकदृष्ट्या वंचित पार्श्वभूमींमधील गुणवंत मुलींच्या उच्च शिक्षणामध्ये साह्य करतो. त्यांना तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात त्यांच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याची संधी देतो. जागतिक स्तरावर एबीबी जुर्गन डॉर्मन स्कॉलरशिप या शिष्यवृत्ती उपक्रमाला स्पॉन्सर देखील करते. या शिष्यवृत्ती उपक्रमाचा वंचित पार्श्वभूमीमधील विद्यार्थ्यांना इंजिनिअरिंगमध्ये करिअर घडवण्यास अडथळा आणणाऱ्या गोष्टींना दूर करत त्यामध्ये करिअर घडवण्यास प्रेरित करण्याचा प्रयत्न आहे.

# केमिकल इंजिनीअरिंग : करिअरची वेगळी वाट

मानवी जीवन हे रासायनिक संयुगांनी पूर्णत: घेरलेले आहे. सकाळी उठल्यावर लागणाऱ्या टूथपेस्ट, टूथब्रश-माउथवॉश, गाडीतील पेट्रोल-इथेनॉल मिश्रण, डिओड्रंटपासून ते रात्री झोपताना वापरणाऱ्या मच्छर पळविणाऱ्या रसायनापर्यंत एकंदर सर्व बाबींमध्ये बारकाईने पाहिल्यास रसायने (केमिकल) आहेत. या केमिकल इंजिनीअरिंग क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध आहेत.

सध्या दिवसागणिक निरनिराळ्या रासायनिक उत्पादनांची मागणी वाढत असल्याने केमिकल इंजिनीअरिंगमध्ये पदवी मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना या क्षेत्रामध्ये करिअर करण्याच्या उत्तम संधी उपलब्ध होऊ शकतात. आपल्या देशात रासायनिक उद्योग जवळपास १५५ अब्ज डॉलरचा आहे. २०२५ मध्ये तो ३२६ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचू शकतो. संपूर्ण जागतिक रासायनिक बाजारपेठेत भारताचा वाटा ३.५ टक्के आहे. या शाखेत प्रवेश मिळविण्यासाठी 'जेईई', 'एमएचटी-सीईटी' स्पर्धा परीक्षा देणे अनिवार्य आहे. अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर केमिकल प्रोसेसिंग, मॅन्युफॅक्चरिंग, प्रिंटिंग, प्लास्टी पॉलिमर, ऑईल व पेंट, पेट्रोलियम व पेट्रोकेमिकल, रिफायनिंग टेक्नॉलॉजी, पल्प व पेपर टेक्नॉलॉजी, औषधनिर्माण, ऑइल व नॅचरल गॅस यांसह विविध क्षेत्रांमध्ये रोजगार मिळविण्यासाठी या शाखेचा फायदा होतो.

केमिकल इंजिनीअरिंगमध्ये कच्च्या रसायनापासून वा मटेरियलपासून भौतिक



व जीवशास्त्रीय विज्ञानाचा वापर करून अधिक उपयुक्त वा मूल्यवान स्वरूपात रूपांतर करण्यासाठीचा अभ्यास केला जातो. उदा. कच्च्या तेलावर प्रक्रिया करून पेट्रोल वा डिझेल मिळवणे. केमिकल इंजिनीअरिंगमध्ये रासायनिक अभिक्रियांचा समावेश असलेल्या कारखान्यांची रचना करणे, उभारणी करणे आणि व्यवस्थापन पाहणे आदींचा समावेश होतो. रासायनिक बदलाचे तत्त्व, रासायनिक संतुलन, वस्तूचे संवर्धन, ऊर्जेचे संवर्धन या चार मूलभूत गोष्टींचा केमिकल इंजिनीअरिंगमध्ये समावेश होतो. उत्पादनाच्या आवश्यकतेनुसार प्लान्टची अनुरूप व सर्वोत्तम रचना उभारणे हे केमिकल इंजिनीअरचे कौशल्य असते.

दिल्ली, मुंबई, गुवाहाटी, कानपूर, खरगपूर, चेन्नई, रुरकीमधील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी संस्था तसेच कानपूरची, आईसीटी मुंबई, एलआईटी नागपूर तसेच के. के. वाघ शिक्षण संस्था संचालित के. के. वाघअभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्था, नाशिक येथे हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे.

सध्या देशात अनेक मल्टिनॅशनल कंपन्या प्रवेश करीत आहेत, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना भरपूर रोजगाराच्या संधींची शक्यता वर्तवली जात आहे. या क्षेत्रात पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम, इंडियन पेट्रोलियम, ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन, राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स, नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन, बार्क, तसेच 'इस्रो'सारख्या सरकारी कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध होऊ शकते. देशातील अग्रगण्य खासगी कंपन्यांमध्येही रोजगार उपलब्ध आहे. ज्यामध्ये रिलायन्स इंडस्ट्रीज, बीएएसएफ, डाऊ केमिकल, ड्यूपॉइंट इंडिया, बायर केमिकल, एशियन पेंट्स, टाटा कन्सल्टन्सी, एल अँड टी, घरडा केमिकल्सचा आदी कंपन्यांचा समावेश आहे. त्यामुळे वेगळी वाट म्हणून विद्यार्थ्यांनी याकडे पाहिल्यास त्यांना नवीन संधींची दालने खुली होऊ शकतील.

- प्रा. पीयूष जोशी, रसायन अभियांत्रिकी विभाग, के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक

# पुण्यस्मरण सोहळा

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ, काकूशेठ उदेशी आणि सरकार महर्षी तात्यासाहेब बोरस्ते यांचा संयुक्त पुण्यस्मरण सोहळा आयोजित केला आहे. हा सोहळा शनिवारी (दि. २२) दुपारी तीन वाजता संस्थेच्या सभागृहात तसेच झूमवरदेखील होणार आहे. यावेळी पदवीधर आमदार सत्यजित तांबे, माजी साखर आयुक्त शेखर गायकवाड, संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ उपस्थित राहणार आहेत.

Maharashtra Times 19-07-2023

# वाघ शिक्षण संस्थेतर्फे शनिवारी कार्यक्रम

नाशिक ता. १८ : सहकारमहर्षी तात्यासाहेब बोरस्ते, कर्मवीर काकासाहेब वाघ, काकूशेठ उदेशी यांच्या पुण्यस्मरणाचा कार्यक्रम के. के. वाघ. शिक्षण संस्थेतर्फे शनिवारी (ता. २२) दुपारी तीनला होईल. हा कार्यक्रम संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयातील चौथ्या मजल्यावर होईल. आमदार सत्यजित तांबे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.माजी साखर आयुक्त शेखर गायकवाड अध्यक्षस्थानी असतील. संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ यांनी दिली.

sakal 19-07-2023

# के. के. वाघ शिक्षण संस्था

## नाशिक आयोजित

मध्यवर्ती कार्यालय : हिराबाई हरिदास विद्यानगरी,
अमृतधाम, पंचवटी, नाशिक – ४२२ ००३.

द्रष्टा ज्ञानयोगी



कै. बाळासाहेब देवराम वाघ
तथा भाऊ

# ॥ सन्माननीय त्रयींच्या पुण्यस्मरण दिनी कोटी-कोटी प्रणाम ॥

शिष्य



कै. सहकार महर्षी
तात्यासाहेब बोरस्ते

गुरु



कै. देवराम सयाजी वाघ
तथा कर्मवीर काकासाहेब वाघ

दानशूर



कै. रतनशी हरिदास उदेशी
तथा काकूशेठ उदेशी

# ॥ पुण्यस्मरण सोहळा ॥

पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ, दानशुर कै. काकुशेठ उदेशी व सहकार महर्षी कै. तात्यासाहेब बोरस्ते या मान्यवरांचा संयुक्त पुण्यतिथी कार्यक्रम खालील प्रमाणे साजरा करण्यात येणार आहे. तरी सदर कार्यक्रमासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

प्रमुख पाहुणे

**मा.श्री. सत्यजीत तांबे**
आमदार, पदवीधर मतदारसंघ, नाशिक विभाग

कार्यक्रमाचे अध्यक्ष

**मा.श्री. शेखर गायकवाड**
मा. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य

निमंत्रक

**श्री. समीर बाळासाहेब वाघ** (अध्यक्ष)
आणि
व्यवस्थापन मंडळ, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद – के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक

ऑनलाईन उपस्थित राहण्यासाठी सदर कोडचा वापर करा : Zoom Meeting ID : 613 596 0075 Passcode : 54321

वार, दिनांक व वेळ : शनिवार, दि.२२/०७/२०२३ दुपारी ३.०० वा.

स्थळ : मिटींग हॉल क्र. २, चौथा मजला, मध्यवर्ती कार्यालय, के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक

Engineering | Agriculture | Pharmacy | Polytechnic | MBA
MCA | Performing Arts | Fine Arts | Senior Colleges | B.Ed. | CBSE & SSC Schools

लोकमत

# नाशिकचे शिक्षणमहर्षी काकासाहेब वाघ



के. के. वाघ शिक्षण संस्था अर्थात कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्था नाशिक ज्यांच्या नावाने दिमाखात सुरू आहे असे कर्मवीर काकासाहेब वाघ माझे आजोबा होते. ते नाशिक जिल्ह्याचे वैभव होते. त्यांना आजी गीताई वाघ यांची खंबीर साथ लाभली. त्यांनी शेतकरी आणि बहुजन समाजासाठी आयुष्यभर आपले सक्रिय योगदान दिले. अ. भा. मराठा विद्या प्रसारक परिषदेचे प्रमुख आधारस्तंभ, मविप्र संस्थेचे आधारवड, निफाड साखर कारखान्याचे अध्यक्ष व रानवड साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष होते. इंडियन शुगर इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन नवी दिल्लीचे अध्यक्ष, नॅशनल फेडरेशन ऑफ को ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज, नवी दिल्लीचे सदस्य होते. शिक्षण क्षेत्रातील जाणकार कर्ते सुधारक, स्वातंत्र्ययोद्धे, धुरंदर राजकारणी, सहकार, कृषी, जलसिंचन क्षेत्रातील सक्रिय कार्यकर्ते शेतमजूर उपेक्षित, गरीब कामगारांचे आधार अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे सांभाळल्या.

काकासाहेबांनंतर माझे वडील व के. के. वाघ शिक्षण संस्थेचे दिवंगत अध्यक्ष कै. बाळासाहेब (भाऊ) वाघ यांनी त्यांचा सहकार, कृषी, शिक्षण, सामाजिक व सांस्कृतिक वारसा पुढे चालू ठेवला. काकासाहेबांप्रमाणेच त्यांनी निफाड तालुका केंद्रस्थानी मानून कोणतेही राजकारण न करता विविध पातळीवर शासन दरबारी प्रश्न सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न केले. राज्यातील शेतकऱ्यांना लेव्ही साखरेस योग्य भाव मिळवून दिला.

- समीर बाळासाहेब वाघ

अध्यक्ष के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक

Nashik Main
Page No. 5 Jul 21, 2023
Powered by: erelego.com

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com



आपलं महानगर www.mymahanagar.com महानगर.com

# कर्मवीर काकासाहेब वाघ, सहकार महर्षी माधवराव बोरस्ते पुण्यतिथीनिमित्त आज ओझर येथे विविध कार्यक्रम




**पिंपळगाव बसवंत ।** ओझर येथे निफाड तालुक्याचे भाग्यविधाते आणि सहकार शिक्षण चळवळीचे व कृषी क्रांतीचे जनक सहकार महर्षी कर्मवीर काकासाहेब वाघ व सहकार महर्षी कर्मवीर तात्यासाहेब तथा महादेवराव बोरस्ते यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि शेतकरी नेते प्रल्हाद पाटील कराड यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आज (दि. २२) ओझर येथील कॅनॉल बागायतदार सहकारी संघ या ठिकाणी सकाळी १०.३० वाजता संस्थेचे चेअरमन माणिकराव बोरस्ते यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम होणार असून, या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून आमदार राहुल आहेर, माजी महापौर दशरथ पाटील हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

निफाड तालुक्यातील काकासाहेब वाघ, तात्यासाहेब बोरस्ते, प्रल्हाद पाटील कराड यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी निफाड तालुक्यातील शेतकरी बांधव व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन माणिकराव बोरस्ते यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कॅनॉल बागायतदार सहकारी संघाचे व्हा. चेअरमन सोमनाथ शेलार, सदस्य सुदाम पाटील, अंबादास चौधरी, आनंदराव बोराडे, नंदकुमार कदम, मोहन पाटील, सुरेश कदम, संतोष बोरस्ते, हर्षल मोरे, विलास शिंदे, बाळासाहेब झाल्टे, बाळासाहेब जाधव, देवदास चौधरी, तानाजी जाधव, अजित कदम, धोंडीराम जाधव, अलका मोरे, कावेरी मोगल, बाळासाहेब हिरे, साहेबराव मोरे, कचरू मोरे, शंकरराव पायघे, दिनकर कदम, मॅनेजर निवृत्ती शिंदे प्रयत्नशील आहेत.

# देशदूत

# कर्मवीरांच्या कार्याची इतिहासात नोंद : आ. तांबे

## वाघ संस्थेत संयुक्त पुण्यतिथीनिमित्त कर्मवीरांना आदरांजली

» पंचवटी । दि. २२ प्रतिनिधी



कर्मवीरांनी स्थापन केलेल्या शिक्षण संस्थांमुळे ग्रामीण भागातील गोरगरीब बहुजन समाजातील व शेतकरी वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुली झाली. तसेच पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ, सहकारमहर्षी कै. माधवराव बोरस्ते व दानशूर कै. काकूशेठ उदेशी या कर्मवीरांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याची नोंद इतिहासात पुढील १०० ते २०० वर्षे झालेली आहे, असे प्रतिपादन आ. सत्यजित तांबे यांनी केले.

पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ, सहकारमहर्षी कै. माधवराव बोरस्ते व दानशूर कै. काकूशेठ उदेशी या त्रयींचा संयुक्त पुण्यस्मरण सोहळा शनिवारी संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात ऑनलाईन व ऑफलाईन पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आ. सत्यजित तांबे बोलत होते. महाराष्ट्र राज्याचे माजी साखर आयुक्त शेखर यांनी अध्यक्षस्थान भूषवले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते व निफाड सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष कै. प्रल्हाद कराड पाटील आणि गोखले एज्युकेशन सोसायटीचे सचिव व महासंचालक कै. सर डॉ. मो. स. गोसावी यांना के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर कर्मवीर काकासाहेब वाघ यांची चित्रफित पाहत त्यांच्या कार्याचा आढावा घेतला. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, मविप्रच्या माजी सरचिटणीस नीलिमा पवार, निफाड साखर कारखान्याचे माजी चेअरमन माणिकराव बोरस्ते, संस्थेचे विश्वस्त चांगदेवराव होळकर, शकुंतला वाघ, सदाशिव ठाकरे, डॉ. के. एन. नांदूरकर, डॉ. शिरीष सारे, डॉ. व्यंकट माने, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी व विविध महाविद्यालयांचे प्राचार्य व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच नाशिक आणि निफाड तालुक्यातील विविध मान्यवर उपस्थित होते.

[redacted]

Deshdoot Edition
Jul 23, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

पुढारी

# वाघ, बोरस्ते व उदेशी यांच्या सामाजिक, शैक्षणिक कार्याची इतिहासात नोंद

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**



कर्मवीरांनी स्थापन केलेल्या शिक्षण संस्थांमुळे ग्रामीण भागातील गोरगरीब बहुजन समाजातील व शेतकरीवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुली झाली आहेत. तसेच पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ, सहकारमहर्षी कै. माधवराव बोरस्ते व दानशूर कै. काकूशेठ उदेशी या कर्मवीरांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेले कार्याची नोंद इतिहासात झाल्याचे प्रतिपादन आमदार सत्यजित तांबे यांनी केले.

- **आ. सत्यजित तांबे : के. के. वाघ संस्थेत संयुक्त पुण्यतिथी**

पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ, सहकारमहर्षी कै. माधवराव बोरस्ते व दानशूर कै. काकूशेठ उदेशी या त्रयींच्या संयुक्त पुण्यस्मरणावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी साखर आयुक्त शेखर गायकवाड होते. व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, मविप्रच्या माजी सरचिटणीस नीलिमा पवार, माणिक बोरस्ते, चांगदेव होळकर, शकुंतला वाघ, सदाशिव ठाकरे, डॉ. के. एन. नांदूरकर, डॉ. शिरीष साने, डॉ. व्यंकट माने, अजिंक्य वाघ, प्रा. के. एस. बंदी आदी उपस्थित होते. नाशिक येथे प्रशासकीय सेवेत दस्तऐवज हाताळताना कर्मवीर वाघ यांचा उदारमतवादीपणा आणि निः स्वार्थीपणा लक्षात येतो. कै. बाळासाहेब वाघ यांनी गेली २० वर्षे काम पाहिले. त्यांच्यामध्येही काकासाहेबांचे गुण दिसतात. या कर्मवीरांमुळे आजमितीस संस्थेचे ७० हजार माजी विद्यार्थी असणे, ही एक महत्त्वाची बाब असल्याचे गायकवाड यांनी सांगितले. दरम्यान, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी प्रास्ताविक, तर स्वाती पवार यांनी सूत्रसंचालन केले. स्वाती पवार यांनी आभार मानले.

My Nashik Edition
Jul 24, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची इतिहासात नोंद

## आ. तांबे : वाघ संस्थेत पुण्यतिथीनिमित्त कर्मवीरांना आदरांजली



नाशिक :

[illegible]

# सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची इतिहासात नोंद

## आ. तांबे : वाघ संस्थेत पुण्यतिथीनिमित्त कर्मवीरांना आदरांजली



नाशिक :

# सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची इतिहासात नोंद

## आ. तांबे : वाघ संस्थेत पुण्यतिथीनिमित्त कर्मवीरांना आदरांजली



नाशिक :

[illegible]